-: प्रेसनोट दिनांक - १०/०१/२०२५ :-

**आरोपी १) सुभाष मधुकर घुणके, वय - ३४ वर्षे, पद - कॉम्प्युटर ऑपरेटर, (खाजगी इसम) पुरवठा कार्यालय हातकणंगले रा. घुणके मळा यळगुड, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर २) शैलेंद्र महादेव डोईफोडे, वय - २२ वर्षे, (खाजगी इसम) रा. सनगर गल्ली, पेठ वडगाव, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........**

---

यातील तक्रारदार यांना पुरवठा कार्यालय हातकणंगले येथील खाजगी कर्मचारी सुभाष घुणके यांनी त्यांचे नाव शासनाच्या राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत प्राधान्य कुटुंब योजनेत पुरवठा कार्यालयातील वरच्या साहेबांना सांगुन समाविष्ठ केले आहे त्याकरीता तक्रारदार यांचेकडे ४०००/- रूपये त्यांना दयावे लागतील. त्यावेळी तक्रारदार हे पैसे जास्त होतात काहीतरी कमी करा असे म्हणाले. त्यावेळी घुणके यांनी सदरचे पैसे वरच्या साहेबांना दयावे लागतात त्यामुळे पैसे काही कमी होणार नाहीत असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली होती. त्यानंतर तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे तक्रार दिलेली होती.

तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये तक्रारदार यांचेकडे सुभाष मधुकर घुणके, खाजगी कर्मचारी, पुरवठा कार्यालय हातकणंगले यानी प्रथम तिन हजाराची मागणी करून करून तडजोडीअंती २५००/- रूपयांची लाच मागणी केलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष सुभाष मधुकर घुणके, कर्मचारी, पुरवठा कार्यालय हातकणंगले यांचे सांगणेवरून शैलेंद्र महादेव डोईफोडे खाजगी इसम यांनी तक्रारदार यांचेकडुन २५००/- रूपये लाच रक्कम स्विकारलेने दोघांना रंगेहाथ पकडणेत आले.

सदरबाबत आरोपी १) सुभाष मधुकर घुणके, वय - ३४ वर्षे, पद - कॉम्प्युटर ऑपरेटर, (खाजगी इसम) पुरवठा कार्यालय हातकणंगले रा. घुणके मळा यळगुड, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर २) शैलेंद्र महादेव डोईफोडे, वय - २२ वर्षे, (खाजगी इसम) रा. सनगर गल्ली, पेठ वडगाव, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द हातकणंगले पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक, सपोफौ प्रकाश भंडारे, पो.हे.कॉ. विकास माने, संदिप काशीद, पो.ना. सचिन पाटील, पो.कॉ. उदय पाटील, चा.पो.कॉ. प्रशांत दावणे ला.प्र.वि.कोल्हापूर ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील,पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९७६४१४०७७७. कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४. ५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.